"मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास" (विशेष संदर्भ- मुखेड तालुका).

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

:: संशोधक ::

संतोष गणपतराव शिंदे

एम.ए., समाजशास्त्रा एम.फिल.

:: मार्गदर्शक ::

डॉ. पांडूरंग राजाराम मुट्ठे

समाजशास्त्र विभाग प्रमुख,

शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ

ता. शिरुर अनंतपाळ जि. लातूर

जुलै : 2022

प्रस्तावना

भारत देश हा जगातील एकूण क्षेत्रफळाच्या दृष्टिने सातव्या क्रमांकाचा आहे. व लोकसंख्येच्या दृष्टिने दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. अशा या विशालमय भारत देशातील समाज विविधतेने नटलेला आहे. भारत देशात विविध जाती, धर्म, वंश, पंथ आणि वेगवेगळी भाषा बोलणारे व संस्कृती भिन्नता असणारे लोक एकत्र राहतात. भारत हा हिंदू संस्कृतीचा अति प्राचिन देश आहे, त्यात हिंदू धर्मात निर्माण झालेल्या असंख्य जाती असून काही पुढारलेल्या तर काही मागास जाती दिसून येतात. भारतावर इतर धर्मांध देशांनी राज्य केले तेंव्हा जाती-जातीत मतभेद निर्माण करुन आपली सत्ता टिकवली. भारत जेंव्हा पारतंत्र्यातून स्वतंत्र झाला तेंव्हा देशामध्ये काही जाती सामाजिक आर्थिकदृष्टया प्रगत होत्या तर काही मागास होत्या. भारतीय जाती व्यस्थेचा विचार करता स्थीर आणि अस्थीर अशा दोन भागात जाती व्यवस्था विभागली आहे. देशाच्या ज्या भागामध्ये एखादी जात स्थीर आहे ते तेथील भागात प्रबळ जात म्हणून पुढे आली आहे. उदा. गुजरात मध्ये पटेल, राजस्थान मध्ये गुजर, हरियाना मध्ये जाट, उत्तर प्रदेश बिहार यादव, आंध्रप्रदेश, तेलंगना रेड्डी, महाराष्ट्रात मराठा जात इत्यादी.

मराठा ही महाराष्ट्रातील संख्येने मोठी असणारी जात आहे. प्राचीन काळी महाराष्ट्राला प्राकृतात महाराष्ट्र असे नाव होते. सातवाहनाच्या काळातले म्हणजे इ. स. पूर्व दुसऱ्या शेतकातले शिलालेख नानेघाट, भाजे, कार्ले, बेडसे, कन्हेरी

येथील लेण्यात सापडलेले आहे. त्यात महारठि हा लोकवाचक शब्द वापरलेला आहे. मराठा या शब्दाचा उपयोग इ.स.पूर्व सहाव्या शतकापासून तत्कालिन निरनिराळ्या विधवांनाच्या ग्रंथात जूनी कोरीव लेनी, नानी तांब्रपट यावर केल्याचे दिसून येते.

प्राचीन काळापासून भारतामध्ये जातीव्यवस्था अस्तित्वात असल्याने समाज व्यवस्थेवर जातीचा जबरदस्त पगडा दिसून येतो. त्यामुळेच भारतीय समाज शास्त्राच्या अभ्यासामध्ये जातीच्या अभ्यासाला अनन्य महत्व प्राप्त झालेले आहे. याविषयी डॉ. इरावती कर्वे, डॉ. एम. एन. श्रीनिवास आणि डॉ. गोविंद सदाशिव धुयें इत्यादी समाजशास्त्रज्ञांनी जाती व्यवस्थेच्या संदर्भात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि धार्मिक बाबतीत महत्वपूर्ण असे अध्ययन केले आहे. डॉ. एम. एन. श्रीनिवास यांच्या 'प्रबळ जात' या संकल्पनेत महाराष्ट्र व मराठवाडयातील या संकल्पनेत महाराष्ट्र व मराठवाडयातील मराठा जातीचा संदर्भ दिसून येतो. एकूणच महाराष्ट्र किंवा मराठवाडयाचा विचार करता येथील भागावर मराठा जातीचे वर्चस्व दिसून येते.

मराठा जात जरी प्रभावी असली तरी तीचे वर्तमान स्थीती स्वरुप बदललेले आहे. आज मराठा जात ही केवळ आणि केवळ लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून प्रबळ समजली जाते. इतर क्षेत्रामध्ये तीचे प्रभावीपण संपत चालले आहे.

भारतीय समाजामध्ये भुमीहीन शेत मजुरांचे प्रमाण १५ टक्याच्या वर आहे. महाराष्ट्रातील जमीनदार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि कित्येक वर्षे सत्तेच्या चाव्या आपल्या हातात असणाऱ्या, महाराष्ट्रातील एक प्रमुख मोठी जात असणाऱ्या मराठा जातीमध्येही भूमिहीन शेतमजूर भूमिहीन महिलांचे प्रमाण अधिक आढळून येते.. एवढेच नाही तर आजच्या काळात या जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या संख्येत वाढ होत असताना दिसून येते. या शेतमजूर महिला सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्टीने मागासलेल्या आहेत. त्यांचे उत्पन्न अल्प असल्याने त्यांच्या मुलभूत गरजांची पुर्तता होत नसल्याने त्यांचे जीवन अंधकारमय बनले आहे. त्यामुळे मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या समस्या दिसेंदिवस उग्ररुप धारण करीत आहेत. यातून त्यांना अनेक समस्यांना तोंड देत आपले जीवन जगावे लागत आहे. त्यामुळे त्यांचे समाजातील स्थान कमालीचे खालावलेले आहे.

म्हणून मी "मराठा जातीतील भूमीहीन शेतमजूर महिलांच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास" (विशेष संदर्भ मुखेड तालुका) या संशोधन विषयाची निवड केलेली आहे.

अध्ययनाचे उद्देश

१) मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या कौटुंबिक व वैवाहिक समस्या जाणून घेणे,

२) मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांचे, कौटुंबिक निर्णय प्रक्रियेतील स्थानाचा शोध घेणे.

३) मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.

४) मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या शैक्षणिक समस्यांचा आढावा घेणे.

५) मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या इतर समस्यांचा शोध घेणे.

६) मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या शासकीय योजना व अनुदान या विषयी असलेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

अध्ययनाचे गृहितके

१) मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांना वैवाहीक व कौटूंबिक समस्यांचा सामना करावा लागतो.

२) मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांना कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत दुय्यम स्थान आहे.

३) मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांमध्ये आर्थिक मागासलेपणाचे प्रमाण अधिक आहे.

४) मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांना शिक्षण घेत असताना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.

५) मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या इतरही समस्या आहेत.

६) मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांना शासकीय योजना व अनुदान या विषयाच्या माहितीचा अभाव आहे.

संशोधन आराखडा

सामाजिक संशोधन आराखडा अत्यंत महत्वाचा आहे. संशोधनात योग्य नियोजन करणे गरजेचे असते. संशोधन आराखडयामध्ये असे नियोजन असते त्यामुळे संशोधनामध्ये सुसुत्रता व सुव्यवस्थेतीतपणा येतो. तसेच संशोधनाला योग्य दिशा मिळवून दिल्यामुळे श्रम, वेळ व पैसा आदीची बचत होते. संशोधन आराखडयाचे स्वरुप वेगवेगळे असते. या संशोधन आराखडयाचे स्वरुप कसे आहे यारुन त्याचे प्रकार पडतात. प्रस्तूत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा प्रमाणभूत मानण्यात आला. विशिष्ट व्यक्ती समुह वा स्थीतीच्या वैशिष्टयाचे तसेच लक्षणांचे यथोचित वर्णन करणे हा वर्णात्मक संशोधन आराखडयाचा हेतू असतो. वर्णनात्मक संशोधन आराखडयावरुन संशोधनाची उद्दिष्टये, नमुनानिवड तथ्यसंकल्पपध्दती, तथ्यांचे संस्कार इत्यादी संशोधनाच्या पायऱ्याबाबत संशोधकाला अनेक निर्णय घ्यावे लागतात.

या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा 'आधार घेण्यात आला. या आराखडयाच्या सहाय्याने मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या समस्यांचे वर्णन करण्यात येणार आहे.

नमुना निवड

प्रस्तुत अध्ययनात गैरसंभाव्यता नमुना निवड प्रकरातील सहेतूक नमुना निवड प्रकाराचा वापर करून मुखेड तालुक्यातील पंचायत समितीच्या एकूण १६ गणातून प्रत्येकी ०३ गावाची निवड करुन प्रत्येक गावातून ०६ (साक्षर ०३ व निरक्षर ०३) अशा एकूण २८८ मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांची अध्ययनासाठी निवड केली जाईल.

नमुना निवडीमुळे वेळ, पैसा व श्रम इत्यादीची बचत होते व वस्तूनिष्ठ व प्रतिनिदीक स्वरुपाचे निष्कर्ष काढता येताता. म्हणूनच समाजशास्त्रीय अभ्यासात आत्यंतीक महत्व देण्यात आलेले आहेत. नमुना निवडी संदर्भात गुड आणि हट असे म्हणतात की 'नमुना त्यातील नावाप्रमाणेच एका विस्तृत स्वरुपाचा लघू प्रति आहे'.

तथ्यसंकलन तंत्र

प्रस्तूत अध्ययनाकरिता प्राथमिक व दुय्यक तथ्य संकलनाच्या स्त्रोचा वापर केला जाईल.

1. प्रस्तुत अध्ययनातील उत्तरदाते ही सर्व साक्षर आहे असे नाही त्यामुळे अनुसूचि या प्राथमिक स्त्रोताचा वापर करुन तथ्य संकलन केले जाईल त्यामुळे तथ्य संकलनास योग्य दिशा मिळेल. हे सर्व करत असताना उत्तरदात्यांना भेटून अभ्यासाचा हेतू सांगून सहकार्याची आपेक्षा केली जाईल..
2. प्रस्तुत विषयाचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर

केला जाईल त्यामुळे मराठा जाती विषयाचे अल्पभूधारक शेतमजूरी करणाऱ्या महिलांच्या समस्या विषयाचे प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, संदर्भ ग्रंथ, मासिके, विशेष अंक, पुस्तके, शासकीय व अशासकीय संस्थांचे अहवाल सांख्यिकीय माहिती प्रमाणपत्रे इत्यादीचा आधार घेतला जाईल.

अभ्यासाचे क्षेत्र

नांदेड जिल्हयातील एक मागास व डोंगरी तालुका म्हणून मुखेड तालुक्याची ओळख आहे. या ठिकाणचे भौगोलिक वातावरण, भूपृष्ठ रचना तशी चांगली नसल्यामुळे या तालुक्यात मजूरी करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे मी माझ्या संशोधन विषयात मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या समस्याचा समाजशास्त्रीय अभ्यास करताना तालुक्यातील १६ गणातून प्रत्येकी ०३ गावाची निवड करुन २८८ उत्तरदात्याकडून माहिती संकलित करुन अभ्यास करणार आहे.

अध्ययनाचे महत्व

प्रस्तूत अध्ययनात मुखेड तालुक्यातील मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या समस्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी हे कार्यक्षेत्र निवडले आहे. मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या जीवनावर सखोल व सर्वांगीण अध्ययन होणे आवश्यक होते यातूनच या भूमिहीन शेतमजूर महिलांच्या समस्यांची वास्तविक परिस्थिती जाणून घेण्याच्या दृष्टिने हे

संशोधन भविष्यात उपयुक्त ठरेल व त्यांच्या समस्येवर काही उपाय शोधनाच्या दृष्टिने हे संशोधन होणे आवश्यक आहे.

या सर्व दृष्टिनेच मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या समस्या विषयीचे संशोधन महत्वाचे आहे. मराठा जात प्रभळ प्रभावी असूनही या जातीला आज आरक्षण मागण्याची गरज का वाटू लागली आहे याचा शोध घेण्याच्या दृष्टीनेही या संशोधनाला विशेष महत्व आहे.

प्रकरण पहिले : ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रस्तूत प्रकरणात विषय संदर्भात प्रस्तावना करुन वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, भूमीहीन शेतमजूर या संकल्पनेचा अर्थ व महिलांच्या समस्या संदर्भात या प्रकरणात आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : संशोधन आराखडा.

प्रस्तुत प्रकरणात अध्ययनाचा उद्देश स्पष्ट केला जाईल याबरोबर अध्ययनाची व्याप्ती गृहीतके, संशोधनाची उपयुक्तता संशोधन पध्दती तंत्र व साधणे, नमुना निवड तथ्य संकलनाचे क्षेत्र, तथ्य संकलनाचे साधणे, तक्याचे वर्गीकरण सांख्यीकीय करण, सारणीकरण, प्रथकरण व अहवाल लेखन इत्यादी बाबी सविस्तरपणे नोंदविल्या जातील.

प्रकरण तिसरे : भूमिहीन शेतमजूर महिलांच्या शैक्षणिक समस्यांची स्थीतीचा अभ्यास

प्रस्तूत प्रकरणात मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या शैक्षणिक स्थीतीचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चौथे : भूमिहीन शेतमजूर महिलांच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास

प्रस्तूत प्रकरणात मराठा जातीतील भूमिहीन शेतमजूर महिलांच्या सद्यःस्थितीत असलेल्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण पाचवे : भूमिहीन शेतमजूर महिलांच्या कौटूंबिक समस्यांचा अभ्यास

प्रस्तूत प्रकरणामध्ये भूमिहीन शेतमजूर महिलांच्या कौटुंबिक व वैवाहिक समस्यांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सहावे : निष्कर्ष आणि शिफारसी

संदर्भ सूची

1. भारतीय खेडी व जाती सौ. कमल मुळे, बी.सी. जोशी प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती 1976.
2. ग्रामीण समाजशास्त्र नाडगोंडे गुरुनाथ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. तिसरी आवृत्ती, १९९७.
3. भारतीय सामाजिक व्यवस्था राम आहूजा, रावत पब्लिकेशन्स, जयपूर तिसरी आवृत्ती २००४.
4. मानववंशशास्त्र इरावती कर्वे रामचंद्र मुटाटकर, श्री गंधर्व वेद प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०१०.

5. भारतीय समाजाची रचना पारंपारिक आणि आधुनिक बॉम्बेडे प्रकाश, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, सहावी आवृत्ती २०२१.
6. भारतीय समाज रचना व परिवर्तन डॉ. दिलीप खैरनार, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २००४.
7. समाजशास्त्रीय रुपरेषा प्रा. ज्योती डोईफोडे, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २००९.
8. हिंदू समाज एक निष्कर्ष डॉ. इरावती कर्वे, दि. कर्वे, मौज प्रकाशन घर पुणे, पहिली आवृत्ती
9. एन.एस. भक्कड, संशोधन पद्धती, प्रशांत प्रकाशन, जळगाव,
10. गुरुनाथ नागगोडे, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००१

संशोधक

संतोष गणपतराव शिंदे

मार्गदर्शक

डॉ. पांडूरंग राजाराम मुट्ठे
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ
ता. शिरुर अनंतपाळ जि. लातूर